युटा मराठी मंडळाचे साहित्यिक त्रैमासिक

वर्ष पहिले, अंक द्वितीय

जुलै २०१८

युटा मराठी मंडळ समिती २०१८-२०१९

अध्यक्षा - अर्चना यादव

उपाध्यक्ष - महेश चव्हाण

कोषाध्यक्षा - प्राची अष्टपुत्रे

सदस्य

सोनाली गोडबोले	मोनल श्रीगोंदेकर
अमित श्रीगोंदेकर	राजेश शिवेकर
रोहित सोनावाले	शौनक सोनटक्के
श्रीवास अष्टपुत्रे	

'आरंभ' त्रैमासिक संपादक मंडळ

श्रीवास अष्टपुत्रे

अमित श्रीगोंदेकर

अर्चना यादव

मुखपृष्ठ संकल्पना व मांडणी - हेमंत गोरे

विशेष सहाय्य -

मिलिंद झोडगे

तपस्या भार्गवे

अनुक्रमणिका

संपादकीय
शीर्षक आणि मुखपृष्ठ - माहिती

ललितलेखन

- A Visit to Taj Mahal - Anushka Yadav
- गझल सम्राट सुरेश भट - श्रीकांत अग्निहोत्री
- Robotics: More fun than I thought - Saee Ashtaputre
- प्रयन्तांती - मेघा शिवेकर
- Project Cleffergy by ChillerParty Youth Leaders
- माझ्या साक्षीतील एक ऐतिहासिक प्रसंग - सौ. तपस्या भार्गवे.
- मातृदेवोभव: पितृदेवोभव: - सौ. तपस्या भार्गवे
- स्वप्न - श्रीवास अष्टपुत्रे

आरोग्य

- Low carb Almond Flour Cookies Receipe - Anuja Bhawalkar

बालविश्व

- Paintings by Isha Rane
- Painting by Saket Rane
- Paintings by Nidhi Choudhari
- Paintings by Vikrant Yadav
- Painting by Nishka Namjoshi
- Painting by Tanishka Shivekar

कविमन

- YOU ARE BEAUTIFUL by Abhidnya Patharkar
- कणा - कुसुमाग्रज

शीर्षक आणि मुखपृष्ठ - माहिती

संपादकीय

कोणीतरी एका महान व्यक्तीने म्हंटलय, “मासिकाची खरी मजा हि दुसऱ्या अकांतच!” कोणीतरी नाही मीच म्हणतोय. असं काही म्हटल्या शिवाय शब्दांना वजन येत नाही आजकाल. हे काय चक्क पुलंची असामी मधली कौपी केलीये. असूदेत. मी गटण्यासारखा साहित्याशी एकनिष्ठ आहे. विनोद पुरे आता.

थोडक्यात ह्या अंकाची माहिती करून द्यायची झाली तर ह्या भागात आपण ललित लेखन, कविता आणि बालगोपाळांनी काढलेली सुंदर चित्रे बघाल. कु. अनुष्का यादव हिने आपल्या ताज महाल भेटीचे प्रवास वर्णन अतिशय सुरेख पद्धतीने केले आहे. श्रीकांत अग्निहोत्री ह्यांनी सुरेश भट ह्या दिग्गजावर लिहिलेला लेख मीहितीपूर्वक तर आहेच पण रसिकमनाला सुखावणारा आहे. कु. सई अष्टपुत्रे, हिने नुकत्याच पार पडलेल्या जागतिक Robotics स्पर्धेत आपल्या संघा बरोबर केलेल्या कामगिरी बद्दलचे वर्णन केले आहे. एखादी अशक्य वाटणारी गोष्ट जेव्हा ध्यास घेऊन केली जाते तेव्हा चमत्कार घडू शकतो. सौ. मेघा शिवेकर ह्यांचा असाच काही अनुभव वाचण्यास मिळेल. पुढे Project Cleffergy या प्रकल्पाच्या माध्यमातून चिल्लर पार्टी संस्थेने सौर ऊर्जेचा प्रसार करण्यासाठी घेतलेल्या प्रयत्नाचा आढावा वाचण्यास मिळेल. पुढे सौ. तपस्या भार्गवे ह्यांनी त्यांच्या मुंबईतल्या जीवनातला डोळ्यासमोर उभा राहणारा प्रसंग मांडला आहे. प्रत्येक घरामध्ये मुलांवर जीवापाड प्रेम करणाऱ्या आई आणि वडिलांच्या आठवणी खातर सौ. तपस्या भार्गवे ह्यांचा लेख वाचण्यास मिळेल. स्वप्नं पाहायला आणि जोपासायला देखील नशीब लागतं, हे दर्शवणारी सुरेख गोष्ट श्रीवास अष्टपुत्रे ह्यांनी लिहिली आहे. सौ. अनुजा भवलकर ह्यांनी Almond Flour Cookies पाककृती सादर केली आहे. ह्या आपल्या इवल्याश्या अंकाची सांगता बाल-गोपाळींनी काढलेल्या सुंदर चित्रांनी केली आहे आणि स्वतःचे आत्मपरीक्षण करण्यास भाग पडणाऱ्या कु. अभिज्ञा पठारकर ने लिहिलेल्या कवितेच्या पंक्तीने होईल.

आपले ह्या आरंभ मासिकाशी असलेले नाते असेच फुलू द्या. ह्या अंकात ज्यांनी आम्हाला त्यांची कलाकृती पाठवली त्यांचे मी मनापासून आभार मानतो. आपल्याला हा अंक नक्कीच आवडेल, तुमच्या प्रतिक्रिया आम्हाला umm@utahmarathi.com वर नक्की कळवा.

आरंभ!!

काव्य शास्त्र विनोदाची लागो सर्वा चाहूल

माय मराठी चे डौलात पडो इथे पाऊल

धरू हाती साहित्याचा सुवर्णमय कुंभ

सर्वां सवे एक दिलाने करूया आरंभ!

- अनुजा जोशी (पटवर्धन)

कुठलेही चांगले कार्य यशस्वी होण्यासाठी जसे चांगले विचार, ध्येय, जिद्द आणि अपार कष्ट करण्याची तयारी या गोष्टींची आवश्यकता असते त्याच प्रमाणे त्या संपूर्ण प्रवासात एक अत्यंत महत्वाचा क्षण म्हणजे जेंव्हा ते कार्य करण्याची इच्छा आपल्या मनात उत्पन्न होते आणि त्या दृष्टीने आपण पहिले पाऊल टाकतो. त्याच क्षणी एका यशस्वी कार्याचा आरंभ झालेला असतो. पहिल्या मासिकाचे प्रकाशन करून आपण या प्रवासातील प्रथम पाऊल टाकतोय. आपल्याला कला प्रदर्शनाची संधी देणारा त्याचप्रमाणे ज्ञान आणि वैचारिक देवाणघेवाणीचा हा प्रवास आपल्या सर्वांना अतिशय आनंदाचा जावो.
युटा मराठी मंडळाच्या त्रैमासिकाला अत्यंत मार्मिक असं शीर्षक सुचवलंय सौ भवाळकर यांनी.

मुखपृष्ठ:
मासिकाच्या शीर्षकाला अनुसरून तसेच युटाच्या परिसराचे चित्रण करणारे पण त्याच बरोबर आपल्याला मराठी पणाची आठवण करून देणारे असे अतिशय सुंदर मुखपृष्ठ तयार केले आहे श्री हेमंत गोरे यांनी.
युटाची ओळख असणारे बर्फाच्छादित डोंगर, डोंगरमाथ्यावर फडकणारा भगवा ध्वज आणि नुकताच उदयास आलेला सूर्य यातून युटा मराठी मंडळाच्या 'आरंभ' या त्रैमासिकाची ओळख अगदी सहजरित्या आपल्याला होते.

Trip to The Taj Mahal

By: Anoushka Yadav

Now, I am probably one of the biggest history nerds ever. I read Shakespeare and watched WWII movies for fun. Amidst all of this, I wondered "What about India? Can I teach my mates anything?" And that is exactly what I did. Growing up here in America, I've seen pictures of the Taj Mahal in the books. That really made me want to go, but I never got the chance. This past December I actually got a chance to visit The Taj Mahal. I was excited because now I didn't have to tell my friends that no, I've never been there before, and the fact that I didn't have to look at it's beauty in books.

The we visited, it was very smoggy there, so I couldn't really see it until I was at the steps. My first reaction was "Wow. It really looks like an onion, but in a good way," (don't lie, you've probably thought that once in your life too). You've got to realize how important of a building it is. If you don't know, Mogul Emperor Shah Jahan made it for his wife Mumtaz Mahal after she died in childbirth. If building a giant marble monument for your honour doesn't scream love, I don't know what does.

The mausoleum itself is so big, but the tombs take up a tiny space inside. I guess Shah Jahan really wanted to make a bold statement. It worked. Inside there are dim candles and red coloured stones that lit up when a light shone on them. Mumtaz Mahal's tomb is at the really center and Shah Jahan's is off center enough to really make your OCD go crazy. It was really solemn inside I didn't expect less because you were walking on top of centuries old bodies.

Shah Jahan was a Mogul emperor born in January 5, 1592 in Lahore, Pakistan. He reigned from 1628 to 1658. He married Mumtaz in 1612. Shah Jahan fell ill in September 1657. When he died in 1666, he was buried next to Mumtaz.

You have a great view (despite the fog) of the Taj Mahal from, the *Laal Kila* or the Red Fort where Shah Jahan used to live and was made

prisoner by his son, Aurangzeb. He met Mumtaz Mahal in the courtyard of the Red Fort. You can imagine how giddy I was when I walked around these historical places. The history of India is so rich and very interesting, I highly suggest reading into it. This place was built between 1631 and 1648. The Taj Mahal is an example of Indo-Islamic architecture with its arches and bright white color. There are four freestanding minarets. It is perfectly symmetrical from the outside. The precious and semi-precious stones add a beautiful touch to the overall structure. It also adds a pop of color to it.

The Taj Mahal is very beautiful and eye catching, but make sure to try and go on a day where there's no smog (Unless of course if you have superhuman sight, or if you have anti fog goggles, go for it, i'm not stopping you), to see it. Not only does it give off a nice taste of history, it raises the stakes for Valentine's Day presents, so please, don't hesitate to ask for a giant monument in your honour. You could even get it made out of chocolate if you want. If you can't get your own though, visit the Taj Mahal anyways. It's worth it!



गझल सम्राट सुरेश भट - श्रीकांत अग्निहोत्री

अद्यापही सुऱ्याला माझा सराव नाही. अद्यापही पुरेसा हा खोल घाव नाही. येथे पिसून माझे काळीज बसलो मी आता भल्याभल्यांच्या हातात डाव नाही!

वयाच्या अडीचव्या वर्षी पोलिओ मुले उजवा पाय जायबंदी झाला तो कायमचा. इयत्ता ११ वीत एकदा नापास, कला शाखेत इंटरमीडिअटला एकदा नापास, आणि B.A. च्या परीक्षेत दोनदा नापास आणि B.A. पास तेही फक्त ३ ऱ्या श्रेणीत.

अशी हस्ती, अशी व्यक्ती जीवनात, आयुष्यात काय कर्तृत्व गाजवणार ?

पण घरातल्या सख्ख्याकडून, मित्रांकडून, सहकाऱ्यांकडून उपहासला गेलेला, उपेक्षिला गेलेला हा साधा माणूस झाला गझल सम्राट सुरेश भट !!

मित्रांनी सहकार्यांनी केलेला अपमान, घरातल्या आप्तांनी स्वकीयांनी केलेला उपहास, दिलेली जिव्हारी लागणारी वागणूक यातून सुरेश भट नावाच्या हस्तीच्या अंतरंगात एक भावनांचे यज्ञकुंड धगधगू लागले आणि त्यात एक एक साध्याच पण तृप्त धारधार शब्दांचे तिर होऊन गझलांच्या प्रत्यंचेवर विराजमान झाले.

घरची परिस्थिती विचित्र, विचित्र अशासाठी कि वडील डॉक्टर होते, पण कर्णबधिर. काका होते पण मनोरुग्ण, सुरेश भटांना एक मुलगी विशाखा व दोन मुले. हर्षवर्धन आणि दुसरा चित्तरंजन पण एक मुलगा अपघातात वारला. नियतीने वेळोवेळी केलेले आघात आणि घात सुरेश भटांनी “हलाहल” सारखे पचवले, पण हलाहल पचविल्यावर साक्षात महादेवाचा, शंकराचाही रंग निळा झाला ! अर्थात बदलला !!

सुरेश भटांच्या प्रत्येक गझले मधून नात्यांची, व्यवहारांची आणि समाजाच्या जडण-घडणीची वास्तविकता अगदी स्पष्ट, उघडपणे आणि तितकीच क्रांतिकारी पद्धतीने मांडली आहे.

कविता, गझल ते आधीही लिहीत होतेच पण आयुष्याचे विष पचवून लिहिताना एक एक शब्द धगधगू लागला.
राहिले रे श्वास किती
जीवन हि तुझी मिजास किती ?
सोबतीला जरी तुझी छाया
मी एक पांगळा प्रवास किती?

पुन्हा तेजाब दुःखाचे जरी फेसाळून गेले
पुन्हा ओठावरी गाणे तुझे घोटाळूनी गेले
उपाशी प्रश्न हा माझा उभा आहे तुझ्या दारी
कसे तारुण्य ते होते मला जे टाळुनी गेले ?

हे प्रत्येक गझलांमधील शेर त्यांची सामाजिक जाणीव किती प्रगल्भ होती याचा परिचय तर देतेच पण त्याच बरोबर त्यांच्या मनातला सल, बोच आणि कटू अनुभवांची ज्वाळा होते.

सुरेश भटांचे वडील डॉक्टर श्रीधर रंगनाथ भट. ते इंग्रजी literature चे रसिक, आई शांता श्रीधर भट या “गृहितगमा” होत्या. त्यांना काव्य कवितांची खूपच आवड होती. त्यांनी सुरेशजींना काव्य कवितांची गोडी लावली. संगीताची आवड सुरेशजींना बँड पथकात घेऊन गेली. ते बासरीही चांगली वाजवीत. भट एक उत्तम गायकही होते. अमरावती या जन्मस्थानीच त्यांच्या गायनाचा कार्यक्रम झाला. त्या वेळी संवादाची (पेटी/ हार्मोनियम) साथ केली होती पंडित हृदयनाथ मंगेशकरांनी (दिनांक २० - २ - १९८४) पंडित हृदयनाथजींना एकदा रस्त्यावरती फूटपाथवर, सुरेशजींनी लिहिलेल्या कवितांचे “बाड” सापडले.
त्या कवितांना त्यांनी चाली लावल्या. त्या लतादीदी, आशा भोसले, सुरेश वाडकर यांनी गाऊन अमर केल्या.

अफाट जिद्दी असलेल्या या गझल सम्राटाने जोर देऊन शरीर इतके मजबूत बनवले कि ते तासन तास मैफिली करू शकत.

इतकेच नव्हे तर दिलीपला (आपल्या भावाला) घेऊन, अमरावती रेल्वे स्थानकावर झालेल्या उड्डाण पुलावरून डबलसीट जात आणि एक दमात तो चढण चालून तो पूल पार करत.

सुरेशजी व्हॉली बॉल, कबड्डी हि खेळत. आकाशदिवा, पतंग, शोभादर्शक (कॅलिडोस्कोप) पेरिस्कोपही बनवत. भालाफेक व तलवारबाजी यात ते निपुण होते. याच कलागुणांची धार त्यांच्या गझलेच्या प्रत्येक शब्दात उतरली आणि कधी तलवारी, कधी सुरे तर कधी भाले झाले. असे असूनही जेव्हा सुरेशजींनी काही भावुक आणि हळुवार गाणी, काही काव्य आणि भावगीते लाजवाब लिहिली.

मालवून टाक दीप, चेतवून अंग अंग राजस किती दिसात, लाभला निवांत संग असे सहजपणे लिहून शृंगारिक काव्यावर हुकूमत गाजवली आणि स्त्रियांच्या भावनांना सहजपणे फुलू दिले. असेच सुरेशजींचे आणखीन एक काव्य..

तरुण आहे रात्र अजुनी, राजसा निजलास का?
एवढ्यातच त्या कुशीवर तू असा वळलास का?
यातून शृंगाराची अतृप्ती आणि लालसेला व्यक्त करण्याची सहजता त्यांनी रसिकांना पोहोचविली.

आणखी एक गीत ..

मी मज हरपून बसले ग
आज पहाटे श्रीरंगाने
प्राजक्ता सम टिपले ग ।।
या काव्यातून सुरेश भटांची शालीन रसिक प्रतिभा प्रकर्षाने जाणवते.

तसेच

आता राहिलो मी जरासा जरासा
उरावा जसा मंद अंती उसासा

किंवा

मला गाव जेव्हा दिसू लागले
खुळे पाय माझे दिसू लागले.

आत्ताच अमृताची बरसून रात्र गेली
स्वप्ने मला दिलेली ऊधळून रात्र गेली

एकापेक्षा एक गझल आणि काव्य !

“आज गोकुळात रंग खेळतो हरी”, “केव्हातरी पहाटे, गीत असावाले तुझ्यासाठी”, “चल उठ रे मुकुंदा”, “चांदण्यात फिरताना”, “चंद्र आता मावळाया”, “गे माय भू तुझे मी” किती किती म्हणून आठवावीत? त्यांची बहुतेक गाणी-गीते लतादीदी, आशाजी आणि सुरेश वाडकरांनी गायली आणि पंडित हृदयनाथजींनी ती स्वरबद्ध केली.
प्रत्येक कविता व गझल लिहिताना भटांची शब्द मांडणी अतिशय “दिलखेच” आहे. त्यामुळे प्रत्येक भावनेचा रंग मग तो द्वेष असो, आवेश असो, उपहास किंवा उपरोध असो आणि चीड, संताप श्रुंगार असो व देशभक्तीपर गीत वा सामाजिक विषयावरती गझल असो हर एक शब्दांचे वजन एकाच ताकदीचे आहे.

हा ठोकरून गेला, तो वापरून गेला.
जो भेटला मला तो वांधा करून गेला

अगदी रोजचेच शब्द, पण विशिष्ठ पद्धतीची शब्द मांडणी त्यांच्या गझलेला एक उंचीवर नेते हेच सुरेश भटांचे वैशिष्ठय.
अशी उंची आणि असे वजन गाठणे फारच कमी मराठी गझलकारांना जमलं.

३०-३५ वर्षे सुरेशजींनी कविता व गझलांचे कार्यक्रम केले त्याला उत्स्फूर्त व विराट प्रतिसाद, गझल व काव्य रसिकांना दिला. ज्यांनी ज्यांनी भटांचा उपहास, अवहेलना किंवा अपमान केला त्यांना गझलसम्राट म्हूणन नावाजल्यावर “विसरून जाऊन खिलाडू वृत्तीची माझ्याकडून अपेक्षा करून नका” असा स्पष्ट आणि धारधार संदेश समकालीनांना दिला.

फक्त ३ कवितासंग्रहातच हा गझलकार “गझलसम्राट” झाला. “रूपगंधा”, “रंग माझा वेगळा”, “एल्गार”, “काफीला”, “झंझावात”, “सप्तरंग” हे सुरेशजींचे काव्य संग्रह आणि “हिंडणारा सूर्य” हे गद्य प्रसिद्ध झाले.

३९ व्या साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष्य होते. अपुरेपणा, आघात, स्वप्नभंग, निराशा, न्यूनगंड, चीड, संताप अशा अनेक वेदना, संवेदनांनी घायाळ असा हा गझलसम्राट, १४ मार्च २००३ रोजी “इतकेच मला जाताना सरणावर कळले होते,
मरणाने केली सुटका जगण्याने छळले होते“ म्हणत या पृथ्वीवरचे गझल साम्राज्य त्यागून निघून गेला, अनंतात विलीन झाला.

ईश्वराजवळ मागायचेच झाले तर गझल रसिक हेच मागतील “परमेश्वरा या सुरेश भटाने या पृथ्वीवर पुन्हा गझल सम्राट म्हूणन जन्म घ्यावा आणि सर्व आम्ही रसिकांनि मनापासून म्हणावे -- इर्शाद !! ”

Robotics: More fun than I thought

- Saee Ashtaputre

It was dinnertime, and instead of eating, my dad was quizzing me on math. He had been doing that every night since he made me do the math elective at my school. I quickly finished my food, told him I had homework, and shut myself in my room. I was just sitting there on my bed, trying to remember everything I knew about coding, because next day was the FLL tryouts. I was really hoping I would get in, because I could not survive another day of math. After a while I decided I didn't know anything about it, and I would just have to wing it.

When we got to the tryouts the next day, I realized that it wouldn't be as complicated as I thought. The first thing we had to do was a worksheet, and then a group activity. We had to use an item from a box and act out something on a piece of paper. We got a lightbulb and had to act out Romeo and Juliet. Since we couldn't talk to each other, we just gave the lightbulb to one of the girls and she used it as the poison. Then, one of the guys pretended to be Romeo and stabbed himself. And I played the extremely important role of a shelf that had the poison on it. Surprisingly, the parents guessed what it was pretty quickly.

That was it for the tryouts and now I just had to wait. On Monday, instead of going to our electives, everyone who tried out went to the FLL room. The coaches started reading the names, starting with the 8th graders. Finally, they announced the 7th graders, and I got in! I was really excited for FLL, but mainly relieved that I didn't have to do math club anymore.

For a few days, we started brainstorming ideas, and I learned that FLL was not at all like what I had expected. It was very different.

FIRST LEGO League is an international competition organized by FIRST. Every year, they release a challenge, which is based of real-world problems such as food safety, recycling, water conservation, etc. Each challenge has three parts, Project, Robot, and Core Values. For the project, teams are challenged to identify a problem within that topic, come up with a solution, and create a prototype. The teams also have to build and program a robot

using LEGO MINDSTORMS technology to complete missions on a game board within 2 minutes and 30 seconds. Everyone is also required to follow the Core Values, by being gracious professionals, working as a team, having fun, etc.

This year's challenge was Hydrodynamics. We were required to create a solution to a problem relating to water. We decided that instead of conserving water, we should just make more! So we researched more about this idea, and we were inspired by Star Wars to create the Thermoelectric Cooler, or TEC for short. The TEC is a device that super cools the air around it, and ice forms onto it. We then reverse the polarity of the Heat Sink and Cooler, so we can melt the ice into water. So basically, we were making water from the air. Our idea was that we could expand this into a shipping container size, so we could help people in hurricanes, earthquakes, or even war. According to our calculations, we could provide water for a minimum of 200 people per day.

After we had our project figured out, we decided to split into two teams and work on both the project and robot at the same time. I was on the robot team. The first robot we made probably hated us, because it refused to do most of the things we programmed it to do. We decided to name it Defiance, since that seemed pretty fitting. Thankfully, our second robot had much better Core Values, so it became Compliance. Maybe Compliance was rubbing off

on Defiance though, because right after we started testing out our missions, Defiance became the good one and Compliance started having problems. Defiance worked really well for two competitions, but at the Razorback, it started hating us again. Well, I guess that's what we get for trusting a robot named Defiance.

By the time we had gotten our robots and missions done, it was almost time for our qualifier. That week, we stayed after school until 6 or 7pm, and practiced all our scripts and robot runs. On the day of the competition, we were all extremely nervous, but we all became hyper really soon. In fact, we were probably the loudest people there. Everyone really enjoyed themselves, and we even made a few new friends with the other teams. It was a lot of fun, and it seemed to end way too quickly.

We got the 1st place Champions Award at our qualifier, which meant that we did the best overall in all parts of the competition (Project, Robot Design, Robot Game, and Core Values) and that we moved on to State. At our State competition, we got the Best Overall Project Award, and we also got invited to the Razorback competition, which was an international competition in Arkansas.

At the Razorback, we also got to meet teams from countries like Norway, S Korea, Japan, India, Israel, Brazil, and of course, the USA. And there were no parents around, so we definitely took advantage of that. It was pretty similar to the other competitions, except it lasted for four days instead of one, and they also had an alliance challenge. It was pretty much the same as the robot game, except we were paired up with another team and could have two robots running at the same time. We got fourth place out of the 36 alliances. The alliance challenge was one of the best parts of the competitions, along with the unlimited free ice-cream.

After the competition was over, it was time for us to return home. When we got to the airport, we realized our flight was delayed and we would miss our second flight. While we were waiting, my friend Arien and I decided to start a game of checkers. We were so bad at it that one game lasted 2 hours! The only reason we stopped was because it was time for us to board. The next day, we were stuck in Houston. We decided to pretend it was a big Core Values activity and go to a museum. There were so many cool things there.

We even saw an actual mummy and a few of us tried to translate a big rock that had hieroglyphs on it. After that, it was finally time for us to go home.

Since our season was over, we decided to celebrate our hard work by having a party. We mostly just ate food and made up ridiculous volleyball moves. Our team clearly isn't the best at sports, since there was a glass of orange juice that probably played better than we did. Our coaches also gave us surprise awards. Each one of them had a special title for the person who got it, and mine was Destroyer of All Wells. This was because there was a well mission, and I couldn't count how many times I had broken it! Some of the other ones were Marvel Maniac, Goddess of Regulations, etc. We then continued playing volleyball, and we finally stopped because so many people got hit and we all wanted to leave the party alive.

Overall, it had been quite an exciting year, and I learned a lot. I can't wait for next year, Into Orbit!

प्रयन्तांती - मेघा शिवेकर

"हॅलो, मेघा एकांकिकेच्या तारखा आल्या. कधी पासून करूयात प्रॅक्टिस सुरु ?" भारत चा फोन आला आणि मग काय पुन्हा धमाल मस्ती नाटकाची प्रॅक्टिस सुरु होणार होती. दरवर्षी याच दरम्यान एकांकिका स्पर्धा असत. मग त्यांचे वेळापत्रक आले कि आमची तयारी सुरु व्हायची. एकांकिकेची स्क्रिप्ट निवडण्यापासून म्युसिक लाईट आणि सगळ्यात महत्वाचे कलाकार.

त्यावेळी भारत चा फोन आला. गेले २ वर्ष आम्ही एकत्रच एकांकिका करत होतो. मात्र यावेळी मी आणखी उत्सुक होते. कारण हि तसाच होत. भारत ने सांगितलं होत कि तुला डोळ्यासमोर ठेवून एकांकिका लिहिलीये म्हणून. त्यामुळे एकांकिका कशी असेल माझं पात्र कसे लिहिलं असेल याची मला खूप उत्सुकता होती. झालं भेटायचा दिवस ठरला. नेहमी प्रमाणे कॅन्टीन मध्ये भेटलो.. मला म्हणाला हे घे स्क्रिप्ट वाचून काढ उद्या बाकीचे येतील कलाकार त्यावेळी त्यांना हि देईल स्क्रिप्ट मग वाचन सुरु करूयात. म्हणाला मनीषा तर आहेच तरी देखील आपल्याला आणखी एक मुलगी हवीये. झेरॉक्स काढलेला काही पानांचा गठ्ठा मला दिला ..म्हटलं अरे स्क्रिप्ट ठीकेय पण नाव काय आहे एकांकिकेचं. म्हटला अग काय सांगू खूप खूप विचार केला पण चांगलं नाव सुचतच नाही. तू स्क्रिप्ट वाच आणि काही सुचतंय का बघ. मी म्हंटल भारत इतक्या स्क्रिप्ट वगैरे लिहितोस आणि साधं नाव नाही ठेवलास एकांकिकेच. म्हणायला लागला मॅडम तुम्हाला डोळ्यासमोर ठेवून लिहिलंय. वाचा जरा कळेल किती अवघड आहे. आणि हसायला लागला. म्हणाला मनीषा तर आहेच तरी देखील आपल्याला आणखी एक मुलगी हवीये.

२ वर्षांपूर्वी त्याला भेटले होते कुणीतरी माझा नंबर दिला होता त्याला त्याच्या एकांकिकेसाठी कलाकार हवे होते. कॉल वर मी त्याला आहो जाहो बोलू लागले तर म्हणाला ताईसाहेब मी तुमच्यापेक्षा ३ वर्षांनी लहान आहे मला आरे तुरेच करा.. मला जाम हसू आले होते. म्हंटले बघुयात जरा या कॅरेक्टर ला. भेटायला हवे याला. ३ वर्षांनी लहान असला तरी उंचीने आणि साहित्याच्या ज्ञानाने मोठाच होता माझ्यापेक्षा. आमचा ५ जणांचा ग्रुप जमला होता मस्त.मी भारत मनीषा अभिजीत आणि रवी. उद्या पुन्हा सगळे भेटणार होतो. फक्त प्रश्न होता दुसऱ्या मुलीचा. एकदा मला रेश्मा म्हणाली होती

मेघा तुझ्याकडे कुठली छोटी एखादा रोल असेल तर सांग मला आवडेल करायला . भारत ला म्हटलं अरे एक मैत्रीण आहे. मस्त आहे एकदम स्वभावाला. तो म्हणाला अग acting येते का. मी म्हंटल शाळेत एका नाटकात होतो आम्ही तेवढीच काय ते तिची असिटिंग माहिती. पण मला वाटत ती मस्त करेल. तो म्हणाला ओके. एकदा स्क्रिप्ट वाच आणि मग सांग तिला तस. त्याने मला ती स्क्रिप्ट तेथेच वाचायला लावली. म्हणाला अबोली, अबोली चे dialogue वाच. मी स्क्रिप्ट वाचताना प्रचंड हसत होते. अतिशय सुंदर विनोदी एकांकिका होती. अबोलीची dialogue वाचताना मी माझ्याबद्दलच वाचत आहे असं वाटत होते. मी खूप खुश झाले होते. भारत ला म्हंटल भारत खूपच मस्त लिहिलीयेस रे. खूप आवडणार आहे लोकांना. हसून हसून वेडे होतील. आणि अबोली बद्दल तर काय सांगू. एक नंबर. मला म्हणाला मग काय किती बडबड करतेस तू माहितिये . आणि तुझं ते हसणे आई ग कसा सहन करणारे तुझा नवरा तुला ,काय माहित. तू लग्नानंतर तुझ्या नवऱ्याशी कशी वागशील हे विचार करूनच लिहिलंय सगळे. बघू आता स्टेज वर कसे दिसेल ते. आणि उद्या भेटूयात म्हणून मी निघाले. मी इतकी खुश होते आणि अचानक लक्षात आले अरे यार मला एकटीलाच ७० टक्के dialogue आहेत स्क्रिप्ट मधील. त्यामुळे पाठांतर जबरदस्त लागेल. जॉब पण नवीन होता, शिवाय येण्या जाण्या मधेही म्हणजे प्रवासातही वेळ बराच जायचा. कसे होईल हे सगळे असा विचार करतच घरी आले. आई पप्पाना स्क्रिप्ट वाचून दाखवली. ते देखील खूप हसले, आई म्हंटली अग करशील तू. नको एवढा विचार करू. जो एक एक तास प्रवासात जातो ना त्यावेळीच स्क्रिप्ट वाचत जा. म्हणजे लक्षात राहील. म्हंटल yes मस्तच आयडिया दिली आईने. रेश्माला फोने केला विचारले एकांकिकेत काम करशील का. मला म्हणाली मेघा मला खूप आवडेल ग पण जमेल का. म्हटलं तू ये उद्या आपण बघू. आमचाच ग्रुप आहे होऊन जाईल फक्त मनापासून acting कर म्हणजे झालं. हो म्हंटली भेटूयात उद्या.

दुसऱ्या दिवसापासून आमची प्रॅक्टिस सुरु झाली. जागेचा प्रश्न होता. वाचन चालू होत तोपर्यन्त काही नाही पण स्टँडिंग चालू झालं कि मोठी जागा हवी होती. म्हणजे स्टेज वर जसे वावरणार आहोत तसे वावरायची प्रॅक्टिस होणे गरजेचं होत. पाहिले काही दिवस हसण्यातच गेले, स्क्रिप्ट वाचता वाचता खूप हसू येत होत. मस्त लिहिलं होत भारत ने. पंचेस पण मस्त होते. मनीषा म्हणाली सध्या तिच्या टेरेस वर करूयात प्रॅक्टिस. काही दिवस तिकडे केली प्रॅक्टिस पण जेंव्हा म्युसिक वर प्रॅक्टिस करणे गरजेचं होत तेंव्हा पुन्हा जागा बदलावी लागली कारण प्लग पॉईंट न्हवता तिच्या टेरेस वर. मग एका

जिमचा हॉल मिळालेला ४-५ दिवसांसाठी. पुन्हा प्रश्न जागेचा. भारताला म्हंटल किती प्रॉब्लेम्स येतायेत रे या वेळी. म्हणाला होईल काहीतरी आपण प्रयत्न करत राहू. आणि आज जरा जास्त वेळ प्रॅक्टिस करू दुसरी जागा मिळेपर्यंत आपल्याला प्रॅक्टिस करता येणार नाही. म्हंटल अरे उद्या ऑफिस आहे माझं. म्हणाला माझं ट्रैनिंग आहे हिंजेवाडीला काही दिवस मी तिकडेच येणारे. तुला लेट झालं तर सांग मी सोडत जाईन तुला सकाली. म्हंटल बराय . दुसऱ्यादिवशी तो आला न्यायला मस्त वाटत होत अर्धातासाची झोप जास्त मिळाली होती ना म्हणून. दुसऱ्याच दिवशी आम्हाला एक हॉल मिळाला. आणि त्यात काही restriction न्हवते सो आमची प्रॅक्टिस आता मस्त सुरु होणार होती. आता कसलाही प्राब्लेम न्हवता . त्या हॉल वर आमच्या मस्त प्रॅक्टिसेस सुरु झाल्या. मात्र एक प्रसंग काही केल्या भारताच्या मनासारखा बसेना. म्हणाला आज हा सीन बसवूनच घरी जाऊ. मेघा तुला उद्या मी सोडेन ऑफिसला . झालं प्रश्नच मिटला होता. बराच वेळ प्रॅक्टिस केली त्या दिवशी. दुसऱ्यादिवशी ठरल्याप्रमाणे भारत न्यायला आला. तरी मला आवरायला लेट झालंच. पटापट आवरले नि निघालो आम्ही. सकाळची वेळ गर्दी पण भरपूर होती. म्हंटल भारत अरे एकांकिकेत आणि . काही कळायच्या आत आमची गाडी घसरली. मी उजव्या तर भारत डाव्या बाजूला पडला. आमच्या शेजारून एक बाईक वाला मोठं पोत आडवं करून घेऊन चालल होता. त्याच पोतं भारताच्या बाइकच्या हँडेल ला अडकलं नि आमची गाडी घसरली. मी पडले त्याच वेळी माझ्या डोक्याच्या काही अंतरावरून एक ट्रक पास झाला पलीकडून बघणाऱ्या लोकांना वाटलं तो ट्रक माझ्यावरूनच गेला. त्या दिवशी मरण काय असते ते मी अनुभवलं. नशीब बलवत्तर म्हणून मी वाचले. त्या ट्रकच्या चाकात नि माझ्या डोक्यात अर्ध्या होताच अंतर असेल. पलीकडून बघणार्याला वाटलं मी ट्रक च्या खाली गेले. लोक भीतीने माझ्या जवळ हि यायला तयार न्हवते,तिकडे भारत ची अवस्था काय होती हे हि मला कळत नव्हतं, लोकांनी फक्त गराडा घातला होता आमच्या भवती. कुणी मदतीला येईना . मी रडत होते. मला प्रचंड वेदना होत होत्या. कुठे लागलं होत काही काळात न्हवत फक्त दुखत होत खूप आणि उठताही येत न्हवत. बघ्याची गर्दी वाढत होती नुसती. थोड्याच वेळात भारत आला माझ्या पाशी. खूप घाबरला आणि चिंतेत होता. मेघा, मेघा अग कशी आहेस तू चल उठ आपण डॉक्टर कडे जाऊ मेघा प्लीज उठ ग .. तो बिचारा खरच खूप घाबरला होता माझी अवस्था पाहून. त्याला मला उभे करता येईना आणि मला स्वतःहून उभं राहता येत न्हवते, प्रयत्न केला त्यावेळी लक्षात

आले कि पायाला च लागलाय आणि त्यामुळे मला उठता येत नाहीये. तेवढ्यात घोळक्यातून एक बाई आली. सगळ्यांना शिव्या देत होती. बघत काय बसलात 'डोले फाडून सगळे अरे लेकरांच्या मदतीला या. ये बाय ये माझ्या खांद्यावर हात ठेव चल मी अन ह्यो तुला उचलतं ग बाये , ये उठ. भारत आणि त्या बाई ने मला खांद्यांचा आधार दिला आणि मी कशी बशी उभी राहिले पण चालन अश्यक्य होते. समोरच एक दवाखाना होता. त्या दोघांनी मला तिथे न्यायचा निर्णय घेतला, तिथे पोहचल्यावर पाहिलं तिसऱ्या मजल्यावर दवाखाना आहे. माझं चालणे अशक्य होत. साधा दवाखाना त्यामुळे लिफ्ट वगैरे प्रकार न्हावयता . शेवटी भारत ने मला उचलल आणि तिसऱ्या मजल्यावर नेलं, त्यालाही लागलंच होत पण पर्याय न्हवता. मग तेथे मला ऍडमिट वगैरे करून घेई पर्यंत ती बाई थांबली नर्स ला म्हणाली या पोराला पण लागलाय बघा जरा. मला म्हणाली ताई सगळे ठीक होईल काळजी करू नको. मी त्यांना थँक यौ म्हंटल. म्हंटले तुमचा नाव नि नंबर द्या. म्हंटल्या कशाला पाहिजे ताई ते सगळे. तुला बार वाटलं म्हणजे झालं, काळजी घे, मी पण नर्स च आहे पण चौकातल्या दवाखान्यात. तू काळजी घे बर येते मी. आणि त्या बाई निघून गेल्या. एवढी मदत केली त्यांनी आमची. कुणी आले न्हवते गर्दीतून मदतीला पण त्या आल्या. खरच देव कुठल्या रूपात भेटेल सांगता येत नाही.

डॉक्टरांनी चेक अप वगैरे केलं. जबरदस्त मुक्का मर लागला होता नि पायाच्या पंज्याला दुखापत झाली होती. त्यामुळे चालत येणार न्हवत कमीत कमी ७ दिवस बेड रेस्ट होती. ७ दिवस बेड रेस्ट?? मी रडू लागले. एक तर दुखत होत आणि दुसरे म्हणजे माझी प्रॅक्टिस. भारत ने आईला फोन करून झाला प्रकार सांगितलं होता. तो म्हंटलं काकी आम्हाला आता सोड्तायेत त्यामुळे आम्ही घरीच येतोय तुम्ही घाबरू नका. रिक्षा करून घरी गेलो. आईने भारत ला मला चहा केलाच होता. भारत ची पण तिने विचारपूस केली. म्हणाला काकी मला खरचट ल्य पण मेघाला बरेच लागलाय आणि तिला ७ दिवस बेड रेस्ट सांगितलीये. आई म्हंटली अरे वाटेल तिला बर तू नको काळजी करू मी घेईन तिची काळजी. औषध लिहून दिलाय का. म्हणाला काकी मी घेऊन येतो औषध. आई म्हणाली अरे नको मेघाचा भाऊ आणेल तू पण आराम कर. म्हणाला नाही मी ठीके मी आणतो. बिचारा लगेच निघाला नि औषध नि जुस नारळपाणी वगैरे घेऊन आला . त्या रात्री मी त्याला फोने केला. म्हंटल भारत सॉरी यार ७ दिवस आता मला प्रॅक्टिस ला नाही येता येणार. तू दुसऱ्या कुणाला तरी घे आणि कर एकांकिका आता फक्त १५ दिवस

राहिलेत. तो म्हणाला काहीपण बोलू नकोस तू फक्त तुझी काळजी घे नाटकाचं बघुयात काय करायचं ते. जीव महत्वाचा. मला खूपच वाईट वाटलं. भारत ने या एकांकिकेसाठी खूप मेहनत घेतली होती. मुसिक रेकॉर्डिंगपासून सेट लाईट सगळेच एकदम उच्च कोटींचं. इतक्या आडथळ्यानंतर आता हा एक मोठं प्रश्न उभा राहीला होता आमच्या समोर. दुसऱ्यादिवशी शिफ्ट नंतर भारत भेटायला आला पुन्हा नारळपाणी फळ घेऊन आला. म्हटलं अरे कशाला हे. म्हणाला राहूदे खा आणि मस्त टुमटुमीत हो परत. त्याला म्हंटल प्लीज प्रॅक्टिस चालू ठेव भारत नि कुणीतरी दुसरी बघ. म्हणाला तुला समोर ठेवून लिहिलंय तूच न्याय देऊ शकते याला. नाटक पुढच्या वर्षी करू आपण तू आता फक्त काळजी घे. मी त्याला म्हंटल ७ दिवस बेड रेस्ट आहे नंतर डॉक्टरला विचारुयात काय करायचं. त्यामुळे तू फक्त प्रॅक्टिस चालू ठेव बाकीच्यांची. शेवटी तो तयार झाला. आणि त्यांनी प्रॅक्टिस चालू केली. ७ व्य दिवशी डॉक्टरांकडे गेलो. ऑक्टर म्हणाले आता बरे आहे पण अजून पूर्ण बार झालं नाही. हळू हळू पाय टेकवायला मग आधाराने काठीने चालायचा प्रयत्न करा. नो सायकलिंग नो जम्पिंग नो स्विमिन्ग . माझा चेहरा पुन्हा पडला. नो सायकलिंग किंवा नो स्विमिन्ग पर्यन्त ठीक होत पण नो जम्पिंग?? कारण संबंध नाटकात मी इकडून तिकडे नुसती बागडते चालणे नाहीच म्हणू शकत त्याला. आता कसे करणार. पण हळू हळू पाय टेकवायचा त्यादिवशी प्रयत्न केला. संध्याकाळी भारत ला बोलावून घेतले म्हंटल चल मला यायचं प्रॅक्टिसला. सगळ्यांना भेटून मला बर वाटेल. तो मला घेऊन गेला. सगळे खुश झाले मीही जाम खुश झाले सगळ्यांना भेटून. दुसरा दिवशी काठीच्या आधारे चालायचा प्रयत्न सुरु केला. खूप दुखत होत. पण मी प्रयत्न चालू ठेवला. त्या दिवशीही मी भारत ला बोलावलं नि आम्ही प्रॅक्टिस ला गेलो. मी एका ठिकाणी बसून फक्त माझे dialogue म्हणत होते. चवथ्या दिवशी मी without काठी लंगडत चालू लागले आणि मी म्हंटल भारत चल स्टँडिंग साठी मी पण येते. त्याने मला जरा आधार दिला उभा राहिला नि मी लंगडत प्रॅक्टिस करू लागले कशीतरी आमची प्रॅक्टिस आम्ही पूर्ण केली न्हवे करावीच लागली कारण आता उद्या स्पर्धा होती. सगळे म्हणालो आपण जेवढा प्रयत्न करायचा तेवढा केलाय. सो ठीक आहे. आपण कमीत कमी प्रेसेंट करू स्वतःला. कॅन्सल करण्याऐवजी प्रेसेंट करण महत्वाचं साग्ग्ळ्यांनाच टेन्शन होत. एककांकिकेचं आणि माझ कारण काल पर्यंत सुद्धा मी लांगडातच होते. स्टेज सेट अप करत असताना तिथले काही ओळखिचे लोक भेटले. म्हणाले अरे तुम्ही करताय का एकांकिका आम्हाला वाटलं नाही करणार. मेघाचा ऐकले

होते आम्ही. आणि मला बघून तर त्यांना धक्काच बसला.. आग मेघा तुला बेड रेस्ट होती ना चालत येत न्हवत ना पाय कसा आहे. काळजी आश्चर्य असे सगळे भाव होते त्यांच्या चेहऱ्यावर. काळजी घे म्हणाले. मी देवाचं नामसमरण केलं. म्हंटल देवा फक्त मीच नाही रे पण हा अख्खा ग्रुप लढलाय. खूप प्रॉब्लेम्स ला आम्ही सामोरे गेलो. प्लीज फक्त आमची एकांकिका व्यवस्थित होऊ दे . पहिली घंटा झाली नि काळजात माझ्या धड धड व्हायला लागले. कधी न्हवे ती भीती वाटली. आपण कसे चालणार आहोत स्टेज वर . देवा प्लीज साथ दे रे. प्रवेश झाला. मी स्टेज वर पाऊल टाकलं आणि काय सांगू अगदी विश्वास बसणार नाही पण मी अगदी व्यवस्थित वावरू लागले स्टेज वर. मला कॉन्फिडन्स आला. माझा हुरूप वाढला. सगळे विनोदाला भरभरून दाद देत होत. टाळ्याचा कडकडाट चालू होता. एकांकिका संपली तेंव्हा प्रेक्षागृह टाळ्यांच्या आवाजांनी दुमदुमून निघाले होते . बॅकस्टेज ला खूप लोक भेटायला आली होती. ऊत्तम स्क्रिप्ट उत्तम अभिनय उत्तम मुसिक असे आम्हाला आवाज येत होते. खूप आनंद झाला होता. आम्ही ग्रुप ने एक मिठी मारली म्हंटले येस वी डिड इट . तो आनंद शब्दात सांगणं कठीण आहे. मला खूप आनंद झाला होता. एक जण आला म्हणाला अग तुझा पाय दुखावला होता ना..अजिबात जाणवलं नाही कशी उड्या मारत होतीस नि भराभरा चालत होतीस. आई तर हे सगळे बघून आनंदाने रडत होती. खूप कौतुक होत होत आमचं २ दिवसानंतर results होते. आमहाला माहिती होत कि इतक्या चांगल्या एकांकिका होत्या स्पर्धेत या वेळी आपले काही नंबर असण्याचे चान्सस न्हवते. तरीही लोक म्हणता होती अरे तुम्हाला पण मिळेल . आम्ही फारश्या अपेक्षा न ठेवता प्रेक्षगृहात गेलो. भाषण वगैरे झाले. आणि वेळ आली result ची. तिसरा क्रमांक गेला ..तीच काही अपेक्षा होती म्हंटल चला नाही मिळल या वेळी आपल्याला काही. तेवढ्यात दुसऱ्या क्रमांकाची घोषणा झाली.तो हि गेले ला . आता तर काही अपेक्षा न्हवती . तेवढ्यात पहिल्या क्रमांकाची घोषणा झाली .. कर्णसुखाची अबोली. आमच्या एकांकिकेला पहिला क्रमांक मिळाला होता. आमच्या आनंदाला पारावर न्हवता. खूप खूप खुश झालो होतो आम्ही. आम्ही सगळे स्टेज वर गेलो. आणि ती ट्रॉफी घेतली.

घोषणा देत खाली आलो. भरून पावलो होतो. चला आता नुसत्या टाळ्या वाजवायच्या. तरी आम्हाला मुसिक लाइट च बक्षीस मिळालंच. बेस्ट ऍक्टर मध्ये भारत दुसरा क्रमांक मिळाल्यानंतर तर आमच्या आनंदाला पारावर राहिला नाही.. आता पार्टी भारत असे म्हणत असताना बेस्ट एक्टरेस ची आंऊन्समेंट वहायला लागली. तिसरा क्रमांक नाही

मग दुसरा पुकारला त्यात होई नाही. मग मी म्हंटल जाऊ दे . जे मिळालाय तेच खूप आहे. तेवढयात पहिला क्रमांक पुकारला मेघा जाधव फॉर कर्णसुखाची अबोली. काय सांगू त्यावेळी कानांवर विश्वास बसेना हात पाय थंड पडले.. पूर्ण प्रेक्षागृह टाळ्या वाजवत होत. मी स्टेज वर जाऊ लागले तस आणखी टाळ्यांचा आवाज वाढायला लागला. त्या दिवशी ती ट्रॉफी हातात घेताना जाणवलं जिथे इच्छा तिथे मार्ग. मनापासून एखाद्या गोष्टीसाठी कष्ट केले तर कितीही संकट आले तरी यश नक्कीच मिळत. त्या ट्रॉफी सोबत हा लाख मोलाचा विचार आणि त्याचा अनुभव घेऊन मी स्टेज वरून खाली आले आणि तरीही टाळ्यांचा गडगडाट चालूच होता.

Project Cleffergy

- By ChillerParty Youth Leaders

(Swayam Sakpal and Anuoshka Yadav)

Utah, this crusty, dry, old state we live in has an F in air quality, the most important subject to pass the high school known as “Habitable.” I don’t know about you, but if I was Utah, I would never show my parents my report card. Of course, anyone living here would be concerned about how they would ever live here. Because of this silent cry of help, the team of 20 something Youth Leaders of Chillar Party gathered around like campers around a campfire ready to roast marshmallows. We started by looking at UN’s 17 sustainable development goals (SDGs) to transform our world. So with this behemoth agenda as the inspiration, we took a list of issues in the world and tried to figure out what we can do. World Hunger? Where do we even start? Education? Easy, don’t do drugs, e=mc^2. We pitched, we debated and eventfully we decided to focus on clean energy.

Once the topic was in place, everyone pitched in. We created posters and video. We found the ways to cut our energy usage. We also raised money to buy solar cookers for folks in India through SolarCooker.org. They are a way to make food with the power of the beautiful sun, not an outlet in the wall.

Was it easy to do all this -maybe. Was is it biggest initiative ever done ? hell no ..

But did we make a difference -definitely

Did we do this all on our own. Nope. We got help from some awesome adults in this effort. Jaswandi Aunty (my mom) wrangled us all together every Sunday for almost 5 months. Shamit Uncle and Sunny Pandita Uncle helped us bounce the ideas for selection, Jeremiah Bennett taught us how to do fundraising, Vijay Yadav Uncle helped us set up the Gofundme account, Sriwas Uncle recorded our video, Vijay

Sakpal Uncle helped us with posters and feedback and lots and lots of folks helped us raise the funds needed. We thank them all.

So now It's your turn help us more with this initiative. How you ask..Just follow simple steps

- Use less electricity and open up a window no matter how much of a vampire you are.
- Try carpooling even if your best friend's 3 year old sibling is too annoying.
- Donate the unused cellphones to folks in need.

Watch out video https://www.facebook.com/thechillarparty/videos/624587507736204/ for more ideas

Try these things and help an entire state be able to live happily. It'll make a huge difference.

- Chillar Party Youth Leaders

(Article Contribution by Swayam Sakpal and Anuoshka Yadav)

The group Chillar Party is a group of kids, age 3 to 15 years old, who volunteer year-round for various activities. The motto of group is "Little Ripples Make Big Waves." Given the opportunity and resources, kids thrive on making changes for the betterment of themselves, and of the world around them. Instilling the seeds of volunteering at an early age can help create positive revolutions.

You can get more information about the group and activities on their website http://www.thechillarparty.com/ or find them on Facebook https://www.facebook.com/thechillarparty

WORLD ENVIRONMENT
DAY (5th June 2017)
{INDIA}

माझ्या साक्षीतील एक ऐतिहासिक प्रसंग - सौ. तपस्या भार्गवे.

इतिहासजमा घटना म्हटली की सर्वांच्या डोळ्यांसमोर उभ्या राहतात देशभक्तीसंबंधीच्या सत्यकथा. सहाजिकच आहे ते! कारण आत्तापर्यंत आपण इतिहासाच्या पुस्तकात हेच तर वाचत आलोय. पण भूकंप, महापूर, अतीवृष्टी यांसारख्या नैसर्गिक आपत्ती का नाही इतिहासजमा होत? माझ्या जीवनप्रवासात मी मुंबईत जाळपोळ, बॉबस्फोटसारखे अनेक ऐतिहासिक प्रसंग पाहिले. मुंबईकरांसाठी आता अशा घटना नवीन नव्हत्या. असो! माझ्यासाठी नवल होतं ते निसर्गाचा म्हणजे वरुणदेवतेचा मुंबईवर झालेला प्रकोप आणि त्यामुळे झालेली काहीशी जीवितहानी व बरीचशी वीत्तहानी. तसे पाहता मुंबईकरांसाठी अतीवृष्टीही नवल नव्हे! पण तरीही माझ्यासाठी मी पाहिलेली ही घटना, हा दिवस म्हणजे माझ्या चित्तात शहारे आणणारा व स्मृतीत कोरला गेलेला एक इतिहासजमा दिवसच: "***२६ जुलै २००५".***

पहाटेपासून रिमझिम पण सततच्या पाऊसधारा सुरुच होत्या. दुपारच्या जेवणानंतर कार्यालयात चुळबूळ सुरु झाली. पाऊसामुळे रेल्वेसेवा मंद झाल्याचे ऐकले, म्हणून वरिष्ठांची अनुमती घेऊन आम्ही सर्वजण घरी लवकर जाण्यास निघालो. बाहेर गुडघ्यापर्यंत पाणी साठले होते, त्यातून पाय रेटत-रेटत पुढे जात होतो. कसेबसे रेल्वेस्टेशन गाठले. रेल्वेरुळावरुन पाणी ओसंडून वाहत होते. मुंबईची रक्तवाहिनी समजली जाणारी रेल्वेसेवा अगदी ठप्प पडली होती. रेल्वेस्टेशनवर अडकलेल्या माणसांचा समुह घराकडे पोहोचण्याच्या एका विशिष्ट तणावात डुंबून गेला होता. माझ्या सहकर्मचा-यांपैकी एकीची दिड वर्षाची तान्हुली तीच्या घरी तीची वाट पाहत होती. त्या तान्ह्या मुलीच्या आईला अधुनमधून वात्सल्यतेचा जो झरा फुटत होता तो तीच्या नेत्रांतून वाहत होता. त्याक्षणी एकदम मला एक मराठी गीत आठवले: "या चिमण्यांनो परत फिरावे घराकडे आपुल्या....तिन्हीसांजा जाहल्या."

रस्त्यांवरील गाड्यांच्या इंजिनांमध्ये पाणी गेल्यामुळे बसगाडया, रिक्षा, टॅक्सी अशी सर्व वाहतूकप्रणालीच बंद पडली, परिणामी वाहतूक कोंडी झाली. परंतू अशा पूरसदृश्य परिस्थितीतही अनेक स्वयंसेवी संघटनांनी माणूसकीचा हात पुढे करुन पूरात अडकलेल्यांना चहाबिस्किटांसारखे अन्नदान केले. ब-याच जणांचे प्राणही वाचविले.

दुरध्वनी, मोबाईलफोन यांसारख्या सेवाही तत्काळ बंद झाल्याने माणसांचा त्यांच्या आप्तस्वकीयांशी होणारा संपर्क तुटला. विजयंत्रणेत पाणी शिरल्याने संपुर्ण मुंबईचा विद्युत पुरवठाही खंडित झाला. ठिकठिकाणचे नाले पूर आलेल्या नदीप्रमाणे वाहू लागले. इमारतींचे तळमजले, बैंठ्याचाळी तसेच झोपडपट्यांमध्ये पाणी भरले. अनेकांचे संसार विस्कळीत झाले. सुर्य अस्ताला गेला तरी आभाळ फाटल्याप्रमाणे पाऊस मात्र कोसळतच होता.

स्टेशनशेजारीच राहणा-या मैत्रिणीच्या घरी कशीबशी चिंताग्रस्त रात्र संपली. दुस-या दिवशी घरी जाताना बाहेरील रस्त्यावरील दृष्य पाहून माझे हृदय स्पंदू लागले. पाऊस थांबला होता. वादळानंतरची नीरव शांतता सर्वत्र पसरली होती. सतत माणसांनी गजबजलेली मुंबई अचानक एवढी शांत आणि स्तब्ध कशी? बाहेर जरी शांतता पसरली होती तरी माझ्या मनात अनेक प्रकरच्या प्रश्नांचे वादळ ओसंडून वाहत होते. एवढ्यात माझे लक्ष रस्त्याच्या कडेला गेले. पाण्याने फुगलेल्या गाद्या, धान्य, डब्बे, कपडे, पावसात घराघरांतून वाहून आलेल्या बारीकसारिक अशा कित्येक वस्तू रस्त्याच्या कडेला विश्रांती घेत होत्या. या जीवघेण्या अतीवृष्टीने कित्येकांचे संसार रस्त्यावर आणले होते. कित्येकांच्या कुटूंबियांची ताटातूट झाली होती. कित्येकांनी आपल्या जीवलगांना गमावले होते तर कित्येकांचा ठावठिकाणाही लागला नाही.

मी मात्र माझ्या कुटूंबियांचा ध्यास घेत शेवटी घर गाठले. घरी आई-बाबांना पाहून एकदम रडू कोसळले. घराच्या तळमजल्यात पाणी भरलेल्याच्या रेषा ठसठशीत दिसत होत्या; जसे समुद्राच्या किना-यावर नुकत्याच झालेल्या ओहोटीच्या लाटांचे ठसे दिसतात. महत्वाचे सामान माळ्यावर हलविले होते. रात्री आई घरी एकटीच होती. बाबा संध्याकाळपासून वसई स्टेशनच्या रुळावरुन भरलेल्या पाण्यातून चालत-चालत पहाटे सहा वाजता अंधेरीला पोहोचले. प्रवासात त्यांनाही ब-याच बिकट परिस्थितींना तोंड द्यावे लागले होते. रेल्वेरुळावरील खड्ड्यामध्ये कोसळल्यामुळे पाणी त्यांच्या गळ्यापर्य़ंत आले होते. एका रश्शीचा आधार मिळाल्याने पुन्हा वर आले. मध्येच त्यांना पाण्यात विद्युत लहरींचे सौम्य झटके जाणवले. तरीही उपाशी पोटी कंबरभर पाण्याला कापत-कापत ते कसेबसे आपल्या मुक्कामापाशी पोहोचले. अर्थात त्यांच्याबरोबर पादक्रमण करणारी अशी बरीच माणसे होती. हे सर्व त्यांनी त्यांच्या कुटूंबासाठी केले. कारण त्यांना हेही माहित नव्हते की त्यांची मुले; 'मी व माझा भाऊ' घरी पोहोचू शकले नाहीत. माझा भाऊ त्याच्या ऑफिसमध्येच राहिला होता. आईचा मात्र मानसिक संयम सुटला. ती अगदी वेडीपिशी

झाली होती, तीच्या घरट्यातील पाखरांपैकी रात्री कोणीच परतले नव्हते. काळोखात रात्रभर ती अश्रु ढाळत होती. दुस-या दिवशी जेव्हा आम्ही सारेजण घरी परतलो तेव्हा त्या चार भिंतींमध्ये सामावलेलं घरकुलाचं महत्व व एकमेकांवरील जिव्हाळा आम्हा सर्वांना कळून चुकला.

पाऊस थांबला.....पाणी ओसरले.... परंतू माझ्या जीवनातील मी अनुभवलेला हा चित्तथरारक प्रसंग आजही आठवला की माझ्या मनातील समुद्र भरती आल्यासारखा खळाळून उठतो. ह्या दिवसाची नोंद एक विश्वकिर्तीमान ऐतिहासिक प्रसंग म्हणून झाली असली तरी माझ्यासाठी मात्र हा जीवनातील एक वैयक्तिक ऐतिहासिक प्रसंग ठरला; मला ख-या अर्थाने आयुष्यातील प्राधानबाब उमजली आणि ती म्हणजे “कुटूंब”.

मातृदेवोभव: पितृदेवोभव: - सौ. तपस्या भार्गवे

नमस्कार **UMM** मित्र-मैत्रिणींनो,

युटाह मराठी मंडळाच्या 'आरंभ' मासिकाच्या दुस-या आवृत्तीसाठी काय लिहायचे ते सुचत नसताना एकदम आठवले की, **"**अरेच्या, हल्लीच **'mother's day and father's day'** झाला तर मग का नाही दोन चार शब्द महान त्या आई-वडिलांबद्दल लिहावे**?"** म्हणून लेखणी चालू केली. लेखणी कसली हो! पुर्वीच्या लेखणीने आता **keyboard** चे रुप घेतले आहे. तेव्हा असे म्हणणे योग्य ठरेल की संगणक चालू करुन **keyboard** ची बटने फटाफट दाबण्यास सुरुवत केली. जे काही सुचत गेले ते इथे तुमच्यासमोर मांडले.

"मातृ देवो भव: पितृ देवो भव:**"** हे विधान आपल्याला आपल्या मराठी शाळेतील शिक्षक अगदी लहानपणापासून शिकवत आलेत. मराठी संस्कृती पुर्वीच्या मराठी शाळांनी खरंच जपली होती. हल्लीच्या इंग्रजी शाळांत या सर्वांचा अभाव नक्कीच जाणवतो. असो! विषयांतर नको. वरील वाक्य अगदी वयाच्या ६व्या वर्षांपासून कानावर पडत आले तरीही या वाक्याचा अर्थ आणि प्रचीति येण्यास मात्र बराच वेळ लागला. आई-वडिलांचा आदर करणे तर शिकलो परंतू त्यांच्याजागेवर राहून त्यांच्या जीवंत भावना आणि वेदना मात्र स्वत: आई-बाबा झाल्यावरच समजल्या.

'आई' या श्ब्दात किती गोडवा आहे. एकाच शब्दात संपूर्ण ब्रम्हांड व्यापून टाकणारा अर्थ आहे. कुठेतरी वाचनात आले होते, "आत्मा आणि ईश्वर यांचा मेळ म्हणजे 'आई'**.** ब्रम्हदेवाने ही सृष्टी निर्माण केली तेव्हा परमेश्वराला प्रत्येक जीवाकडे लक्ष द्यायला पुरेसा वेळ नव्हता म्हणून की काय त्याने 'आई' निर्माण केली. 'आई' जीच्या मायेला काहीच तोड नाही अशी 'आई'**.** बाळ रडत असेल, आजारी असेल तेव्हा संपूर्ण जग झोपले असले तरी रात्र जागून हाताचा पाळणा करणारी आणि मिठाच्या पाण्याच्या घड्या बाळाच्या माथ्यावर रात्रभर ठेवणारी आई. ठेच मुलाला लागली तर कोसभर दुर असली तरी त्याच्या वेदनांची जीवंत जाणीव होऊन रडणारी आई. सानेगुरुजींसाठी कल्पतरु 'आई' आणि गुरुमाऊली 'आई', पवित्र वात्सल्यसिंधू अशी संथ नदी आहे आई, स्वच्छ निर्मळ खळखळणारा झरा आहे आई, कधी अथांग सागर आहे आई ... तर कधी

विशाल आकाश आहे 'आई'.... कधी मायेची छाया देणारी विस्तूत डवरलेला वृक्ष आहे 'आई'..... `मां', `**mother**' किंवा 'आई' अशा दोन-चार शब्दांत तीची महती बांधून ठेवूच शकत नाही. नावारुपाच्या पलीकडील केवळ जाणीवरुप आहे 'आई'.

'बाबा' म्हटले की डोळ्यांसमोर एक भारदस्त व्यक्तिमत्व उभं राहतं, काहीजणांना अपवादही असतील! पण बाबांसाठी मला योग्य उपमा आठवते ती म्हणजे पाठिचा मणका, ज्यावर संपूर्ण शरीर उभं असतं किंवा घराच्या मधला वासा (जुन्या घरांमधे असणारा मधला भक्कम लाकडाचा टेकू) ज्यावर संपूर्ण घराचा भार उभा असतो. आईच्या मायेच्या हाताबरोबरच बाबांचा आधाराचा हात हवा असतो. तेव्हाच कुटूंब संतुलन अनुभवण्यास मिळतं. आईची माया व बाबांचा धाक यांचा संमेळ झाल्याशिवाय मुलांवर घट्ट संस्कार कसे घडतील? लहानपणी बोट पकडून चालायला शिकवण्यापासून त्यांनी हया जगाचा मार्ग दाखवण्यास सुरुवात केली. चांगल्या-वाईटाचे धडे दिले, योग्य-अयोग्याची जाणीव करुन दिली. आजही बाबांनी दिलेल्या संस्कारांचा आम्हा भावंडांना जितका धाक आहे, तितकाच अभिमान देखील आहे. तीच संस्कारांची शिदोरी घेऊन आम्ही भावंडांनी आमच्या संसाराची वाटचाल सुरु केली. मला अजूनही आठवते की लहानपणी माझी आई खूप आजारी असायची तेव्हा बाबा सकाळी लवकर उठून आम्हा भावंडांसाठी पोळी भाजीचा डबा भरून देत असत. तो डबा खाताना मला त्यांची खूप आठवण यायची! वेळ पडेल तेव्हा धिटाईने घरचे आणि बाहेरचे सांभाळून-करुन आम्हाला लहानाचे मोठे केले. कर्तव्यदक्षता, मनाचा खंबीरपणा, श्रम आणि चिकाटी या गोष्टी मी माझ्या बाबांकडून वारसा म्हणून घेतल्या.

कधीतरी विचार करुन पहा की पालक आपल्या मुलांसाठी एवढं का करतात? या प्रशाचे उत्तरच सापडत नाही. मी एवढेच म्हणेन की नि:स्वार्थ प्रेमाचे मुर्तीमंत रुप पहावयाचे असेल तर आपण आपल्या आई-बाबांना पहावे आणि रोज त्यांना नमन करावे. त्यांच्या प्रेमाचे ऋण कोणत्याच जन्मी फेडता न येण्याइतके आहेत परंतू रोज सकाळी ईश्वरस्मरणाबरोबरच आई-बाबांचे नित्य स्मरण करुन एकदा मनस्वी कृतज्ञता व्यक्त करणे तरी आपल्या हातात आहे. म्हणूनच लेखाच्या सुरुवातीला उल्लेख केल्याप्रमाणे आपल्या धर्मात म्हटले आहे, "मातृदेवोभव: पितृदेवोभव:"

स्वप्न - श्रीवास अष्टपुत्रे

रोजच्या कामाचा आणि शहरातल्या धकाधकीच्या जीवनाचा कंटाळा आला कि मी काही दिवस रजा काढून गावाकडे जातो. चार पाच दिवस तिकडे राहून आलं कि माझा सगळा शीण निघून जातो. पुण्यापासून माझं गाव फारतर दोन तासाच्या अंतरावर आहे. पण या शहरी गडबड गोंधळापासून खूप लांब. तिकडे गावाकडे दिवस म्हणजे अगदी निवांत सुरु होतो. आमच्या वाड्यात पूर्वी म्हणे पिंपळाचं झाड होतं, ते झाड गेलं पण त्याचा पार अजूनही आहे. त्या पारावर सकाळी बसून कोवळं ऊन खाणे हा म्हणजे अगदी माझ्या आवडीचा कार्यक्रम. मग अशावेळी मला आसपासच्या माणसांचा, रस्त्यावर धावणाऱ्या गाड्यांचा आणि एकंदरच कुठल्याही यंत्राचा कोलाहल ऐकू येईनासा होतो. ऐकू येते ती वाऱ्यामुळे होणारी पानांची सळसळ, परसात दाण्यासाठी आलेल्या चिमण्यांची चिवचिव, बंबात जळून मोडणाऱ्या लाकडांचा आवाज आणि नळातून सामान कालावधीने गळणाऱ्या थेंबांची टिपटिप. अगदी आईने हाका मारे पर्यंत मी तिथे बसून असतो. मग आई म्हणते "उठा महाशय नऊ वाजतील आता, आज कुठे बाहेर जायचं आहे कि नाही? मित्र जमले असतील एव्हाना." मग थोड्यावेळाने बंबासाठी ढपल्या फोडायच्या, बंब पेटवून पाणी तापवायचं, परसातल्या झाडांना पाणी द्यायचं यांसारख्या कामात सकाळ घालवायची आणि मग गावात किंवा आसपास मनसोक्त फिरायचं. या सारखं सूख दुसरं कुठलंच नाही.

गावाकडं गेलं कि माझं मन रमतं याचं अजून एक कारण म्हणजे मला माझा छंद जोपासता येतो. गावापासून जवळ अशी बरीच ठिकाणं आहेत तिथे जाऊन मग मी निसर्गचित्र काढतो. कागद, रंग, ब्रश एका पिशवीत टाकायचे, थोडं पाणी आणि मध्येच काही खाण्यासाठी खाऊ घ्यायचा आणि सायकल घेऊन निघायचं. ठरवून असं कुठेच जावं लागत नाही. कुठल्याही दिशेला गावापासून दहा पंधरा मिनिटांच्या अंतरावर सुद्धा अशी ठिकाणं दिसतात कि जी अगदी चित्रात असल्यासारखीच वाटतात. सर्वत्र पसरलेली हिरवीगार शेतं, शेतांच्या मागे दूरवर दिसणारे डोंगर, कुठल्यातरी शेताच्या बांधावर चरत असणारा शेळ्यांचा कळप, मध्येच एखाद्या झाडाच्या सावलीत रवंथ करीत बसलेली बैलांची जोडी, शेजारी गवताच्या भारानी भरून ठेवलेली बैलगाडी, रस्त्याच्या दुतर्फा असणाऱ्या आंबा, वड यांसारख्या झाडांनी धरलेली कमान, अशा

सगळ्या वातावरणात एकदा मी गेलो की मग मला वेळेचं भानच रहात नाही. तासन तास मग मी तिथे चित्रं काढीत बसून राहतो.

त्या ही दिवशी असाच मी रंग, ब्रश, पेपर घेऊन निघालो. गावाच्या पूर्वेला पंधरा वीस मिनिटे गेलं कि एक ओढा लागतो. त्याच्या दोनही बाजूला शेती आहे. ओढ्याच्या उजव्या बाजूने मातीचा कच्चा रस्ता जातो. बैलगाड्या, ट्रॅक्टर किंवा फारतर छोट्या गाड्या यांची अधूनमधून येजा असते त्यावर. त्या रस्त्यावर मी सायकल मारीत चाललो होतो. एक छानसं वडाचं झाड दिसलं भरपूर सावली असणारं. त्या ठिकाणी ओढ्याचे पात्र हि चांगले रुंद होते. तेथून वरच्या बाजूला ओढा थोड्या उंचीवरून पडत असल्यामुळे छान दिसत होता. या ओढ्याने या भागातल्या कित्येक पिढ्या बघितल्या असाव्यात कारण ओढ्याच्या पाण्याने पात्र चांगले आठ दहा फूट खोल नेले होते. ओढ्याच्या पलीकडे शेतात एक कौलारू घर होतं. त्या बाहेर बाजेवर एक वृद्ध शेतकरी ऊन खात शेतावर नजर ठेवून बसला होता. घराच्या भिंतीला एक बैलगाडीचे चाक टेकवून ठेवले होते. मला एकंदरच तो परिसर फार आवडला. झाडाच्या बुंध्याला टेकूनच थोडासा भाग साफ करून मी बसलो. चित्राचं सामान मांडून झाल्यावर मग मी हातात कागद आणि पेन्सिल घेऊन चित्र रेखाटायला लागलो. रस्त्याला साहजिकच वर्दळ कमी होती. एकंदरच शांतता असल्यामुळे मलाही फार छान वाटत होत. थोड्यावेळाने डेअरीमध्ये दूधाचा रतीब घालून परत येणारा एक माणूस आला. पांढरा लेंगा, आकाशी रंगाचा सदरा आणि डोक्यावर पांढरी गांधीटोपी घातलेला तो इसम सायकलवर अडकवलेल्या दुधाच्या कीटल्या घेऊन चालला होता. जवळ आल्यावर तो थांबला,

"काय पावन कुठलं तुमी?" अशी चौकशी त्याने केली. मग मी माझी थोडक्यात माहिती सांगितल्यावर

"असं, म्हनजे मास्तरांचं चिरंजीव कि तुम्ही"

"कुठं असता?"

मी म्हणालो "पुण्याला असतो, सुट्टी घेऊन आलोय चार दिवस"

"बरंय चालुद्या तुमचं, मास्तर कसे आहेत? बरेच दिवसात गाठ न्हाई पडली, त्येना सांगा पवारांचा नामा इचारत होता म्हनून, चला येऊ का?" असं म्हणून तो निघून गेला.

मीही माझं काम पुढे चालू केलं.

थोड्यावेळाने उतारावरून एक बैलगाडी आली, जवळ आल्यावर गाडी हाकणाऱ्या इसमाने "हररर हो हो" असा आवाज काढत गाडीचा वेग जरा कमी केला. डोकावून बघत असलेल्या त्या इसमाकडे मी बघितल्यावर, हात उंचावून त्याने मला राम राम केला आणि लगेचच तो निघून गेला.

आता पर्यंत माझी दोन चित्रं काढून झाली होती. मग मी थोडावेळ पाय पसरून तसाच बसून राहिलो. झाडाच्या सावलीत छान गारवा वाटत होता. समोरून वाहणाऱ्या ओढ्याच्या पाण्याचा आवाज, मध्येच येणारी वाऱ्याची झुळूक आणि त्यामुळे होणारी पानांची सळसळ या सगळ्यामुळे तिथून उठावंसं वाटत नव्हतं. इतक्यावेळात पलीकडचा तो म्हातारा शेतकरी सुद्धा त्याच्या शेतात एक फेरफटका मारून परत येऊन बाजेवर बसला होता. अधेमधे कदाचित कुतूहलाने म्हणून तो माझ्याकडे बघायचा, एकदा मीही त्याला हात वर करून प्रतिसाद दिला पण त्याकडे त्याने फारसं लक्ष दिलं नाही.

साधारण बारा साडेबारा वाजले होते. मलाही भुकेची जाणीव होऊ लागली होती आणि आता घरी परतावं असं वाटू लागलं होत.

तेवढ्यात शाळेतली काही मुलं तिथे पोचली. चार पाच मुलांचा घोळका माझ्या आजूबाजूला जमला. मी काढलेल्या चित्रांकडे कौतुकाने, कुतूहलाने पाहत एकमेकांशी ते कुजबुज करीत थांबले होते.

त्यातलाच एक इतरांपेक्षा वयाने थोडा मोठा वाटणारा आणि त्या सगळ्यांचा म्होरक्या वाटेल असा मुलगा पुढे झाला. मला म्हणाला

"तुम्ही काढली का हि चित्रं?"

मी म्हणालो "हो, आवडली का? कशी आहेत?"

"लई भारी आलीत की, पन त्या म्हाताऱ्याचं कशाला काढलंय चित्रं?"

मी म्हणालो "का रे असं का विचारतोयस?"

तो म्हणाला "लय बेणं हाय ते, मागं आम्ही सगळे तिथं कैऱ्या पाडायला गेलतो तर दगड घेऊन मागं लागला आमच्या, लई पळवला त्याला आम्ही"

त्याच्या या वाक्याने मला हसायला आलं, तशी बाकी पोरं सुद्धा हसायला लागली.

"तुमाला माहीतीयेका आमचा संत्या पण लय भारी चित्रं काढतो" एका पोराकडे बोट दाखवून तो म्हणाला. "अय संत्या अर ये कीं पुढं" त्याने त्या पोराला हाताला धरून पुढे ओढलं.

एक काळा सावळा, कमी उंचीचा आणि अगदीच बारीक अंग काठी असलेला मुलगा पुढे आला. मळकट असा शाळेचा गणवेश त्याने घातला होता. वह्या पुस्तकांची एक पिशवी त्याने खांद्यावर टाकली होती. अगदीच गरीब असे भाव त्याच्या चेहऱ्यावर होते. आणि नजर त्याच्याच पावलांजवळ अडकवून तो खाली मान घालून उभा होता.

बाकीच्या पोरांनी पण "व्हय लय भारी चित्रं काढतोय हा" असं म्हणून त्याला दुजोरा दिला.

मी त्याला विचारलं "संतोष नाव आहे का तुझं?" तर त्याने नुसती मान होकारार्थी हलवली.

मी म्हणालो "एक चित्रं काढून दाखवतोस का मला? माझ्याकडे कागद, रंग, पेन्सिल सगळं आहे. घे हे आणि काढ एक चित्रं"

संकोच त्याच्या चेहऱ्यावर अगदी दिसत होता पण बाकी पोरांनी ' अय संत्या आरं काढ की ' असा दम वजा आग्रह केल्यानंतर त्याने चित्र काढायला सुरुवात केली. त्याने मारलेल्या प्रत्येक रेषेबरोबर देवाने त्याला दिलेली कला आणि निसर्गाच्या इतक्या जवळ असल्याने त्याला रंगांची उपजतच असलेली ओळख याची जाणीव नक्कीच होत होती.

चित्र काढून झालं, ते त्यांनी माझ्या हातात दिलं आणि तो म्हणाला "मी जातो आण्णा रागावतील" शाळेची पिशवी पाठीवर टाकून तो पळतच निघाला.

त्यांचा म्होरक्या वाटणाऱ्या पोराला मी विचारलं "अरे, नाव काय तुझं आणि हा संतोष कुठे राहतो माहिती आहे का तुला? मला त्याच्या घरी घेऊन जाशील उद्या?"

तो म्हणाला "चालतंय कि"

दुसऱ्या दिवशी ठरलेल्या वेळे आधीच तो अभ्या आणि त्याचे दोन-तीन मित्र माझी वाट बघत होते. ते मला एका शेतात घेऊन गेले. त्या शेतामध्येच दोन खोल्या होत्या त्यात संतोष राहतो असे मला समजले.

"हे संतोष चे शेत आहे का?" मी अभय ला विचारलं

"न्हाय, त्याचा बाप आन आई इथं काम करतात, ह्या सच्या बोराटेच्या बापाचं शेत हाय हे" अभय ने सगळी माहिती पुरवली.

आम्ही आलोय हे कळताच संतोष बाहेर आला, आणि त्याने त्याच्या आई ला हाक मारली. आम्हाला बसायला सांगून पाणी दिल्यावर तिने संतोषच्या छोट्या बहिणीला त्याच्या वडिलांना बोलावून आणण्यासाठी पिटाळलं. संतोषचे वडील तेव्हा शेतात कुठेतरी काम करत होते.

थोड्या वेळाने संतोषचे वडील येताना दिसले, बारीक अंगकाठी, कमी उंची आणि दिवसभर उन्हातान्हात केलेल्या कामांमुळे रापलेला रंग एकंदरच त्यांच्या कष्टांची जाणीव करून देत होता. जवळ येताच त्यांनी मला विचारलं

"आमच्या संतोषचे मास्तर का तुम्ही?"

मी म्हणालो "नाही, पण त्याच्या बद्दलच बोलायला आलोय"

आदल्या दिवशी घडलेली हकीगत मी त्यांना सांगितली, संतोषच्या कलेविषयी आणि त्याने कष्ट घेऊन चित्रकलेत अजून शिक्षण घेतलं तर त्याचा कसा फायदा होईल हे मी सांगत होतो.

बोलताबोलता मी पटकन त्यांना म्हणालो " तुम्ही स्वप्नातही विचार केला नसेल अशी कला संतोषकडे आहे"

हे ऐकताच त्यांच्या डोळ्यात मला दुःखाची छटा जाणवली, एक वेगळंच उदास हास्य त्यांच्या चेहऱ्यावर होतं आणि काही क्षण ते शून्यात नजर लावून बसून होते. नकळत का होईना पण आपल्या तोंडून नक्कीच काहीतरी चुकीचे शब्द निघून गेलेत याची जाणीव मला झाली. मी पटकन त्यांना म्हणालो

"माफ करा आण्णा पण तुम्हाला दुखवायचं असा हेतू नव्हता माझा, काही चुकीचे बोललो असेल तर मी माफी मागतो"

त्यावर ते म्हणाले "अहो असं बोलू नका सर, माझ्या पोरासाठी एवढं कळकळीने तुम्ही बोलताय याची जाणीव आहे मला. तुम्ही का माफी मागताय? तुमची काही चूक नाही यात. पण बघा ना सर, माणसाच्या परिस्थितीवरूनच त्याच्या स्वप्नांची लायकी ठरवली जाते, गरीब माणूस असेल; ज्याच्या कडे जमीन नाही, पैसा नाही तर तो जास्तीत जास्त काय स्वप्न बघेल? दोन वेळा जेवण कसं मिळेल, डोक्यावर छप्पर कसं राहील? आणि औषध पाण्यासाठी थोडा पैसा कसा जमेल? हो ना? पण या सगळ्या गरीबाच्या गरजा असतात स्वप्नं नाही हे लोकं विसरतात”

मी जास्तीच ओशाळल्यासारखा झालोय हे त्यांच्या लक्षात आलं असावं कारण विषय बदलून ते मला म्हणाले

"ते जाऊद्या सर, तुम्ही चहा घ्या मी आलोच एक मिनिटात"

घरात जाऊन ते एक जुनी लोखंडी ट्रंक घेऊन आले. त्यातून काही चित्रं काढून त्यांनी माझ्याकडे दिली.

"ही मी काढलेली चित्रं आहेत सर, लहानपणी मला पण चित्रकलेचा नाद होता, वेळ मिळेल तेव्हा मी चित्रं काढायचो, तेव्हा एवढं कळायचं नाही पण कदाचित चित्र काढणं हेच माझं स्वप्न होतं"

त्या चित्रांकडे बघताना त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद विलक्षण होता. संतोषच्या अंगात हि कला कशी आली याचं उत्तर मला तेव्हा मिळालं.

त्या चित्रांखाली काही अर्धवट जळालेली चित्रं होती, त्याच्या बद्दल विचारलं तेव्हा संतोष चे वडील म्हणाले

"सर तुम्ही विचारलंत म्हणून सांगतो, गरिबीची साथ अगदी पहिल्यापासून, माझ्या बापाकडे जमिनीचा अगदी लहान तुकडा होता, आम्ही चार भावंडं. मी एकटाच मुलगा आणि तीन बहिणी. जमीन पावसावर अवलंबून असल्यानं कधी पीक यायचं कधी जळायचं. वडिलांनी खूप कष्ट केले सर, पण नशीब साथ देत नसेल तर माणूस किती दिवस टिकणार? माझं शिक्षण, बहिणींची लग्न आणि माझ्या आईचं आजारपण यात पार संपला माझा बाप, कर्ज झालं जमीन पण गेली. शेवटी व्यसन लागलं आणि एकदा त्यांनी मला चित्र काढताना पाहिलं, भडकले आणि दिली सगळी पेटवून. कशीबशी वाचवली मी".

हे ऐकताना माझं मन अगदी सुन्न झालं होत. ते पुढे सांगत होते.

"सर, पण मला बापाचा राग नाहीये, हा; त्या क्षणी आला असेल; पण आता विचार केला तर जाणवतं, त्यांची काय चूक नाही त्यात, आमच्या सगळ्यांसाठी एकटे कष्ट करत होते ते".

संतोष नि काढलेलं चित्र हातात घेऊन ते म्हणाले "तुम्ही आज आला नसतात तर माझं स्वप्न परत आठवलं नसत कदाचित, कामाच्या नादात पोराच्या अंगातली कला पण जाणवली नसती. त्याच स्वप्न काय आहे हे अत्ता मला माहित नाही सर पण ते काहीही असेल, मला जेवढं शक्य असेल ते सगळं मी त्याच्यासाठी करणार".

नंतर आम्ही बराच वेळ बोलत बसलो होतो. संतोषला प्रोत्साहन म्हणून चित्रकलेचं साहित्य देण्यासाठीची परवानगी मी त्यांच्याकडून मिळवली. जेव्हा जेव्हा मी गावाला येईल तेव्हा माझ्याबरोबर चित्र काढायला येण्याचीही कबुली मी संतोषकडून घेतली.

निरोप घेऊन निघालो. परतीच्या वाटेवर पुन्हा तेच वडाचं झाड दिसलं. त्याच्या सावलीत थोडा वेळ थांबलो, झाडाची गर्द सावली, ओढ्याच्या खळाळणाऱ्या पाण्याचा आवाज, थंड हवेची झुळूक सगळंकाही कालच्या सारखंच होतं. फरक एकच होता, काल चित्रकला हा माझ्यासाठी फक्त एक छंद होता पण आज त्यामध्ये दोन स्वप्नं जोडली गेली होती.

Low carb Almond flour cookies

- By Anooja Bhawalkar

Enjoy these cookies with tea or just by themselves. These are sugar- free, eggless cookies.
The recipe instead makes use of maple syrup.

Why low carb?
A low carb diet is simply nothing but reducing your “carbohydrate” intake to better your diet.
When you eat food items that are high in carbs, like a plate of pasta, your body converts it to sugar in your bloodstream. Any excess sugar in your bloodstream that is not used as energy is stored as fat. This fat is responsible for problems like obesity, diabetes, hypertension and heart attack.
In addition, just lowering intake of sweets does not lead to low carb lifestyle. Sugar from eating bread or a candy bar has the same effect on your body's blood sugar.
Substitute Sugar with Maple syrup: Maple syrup is a natural sweetener and has a low glycemic index (Low glycemic index - keeps body sugar level

constant). In addition, maple syrup has many additional health benefits. Try to substitute sugar with maple syrup in your diet wherever practical.

Almond flour: Another ingredient that makes this recipe healthy is almond flour. Almond flour is high in protein and low in carbs and as a result makes a better substitute for all-purpose flour.

Recipe Ingredients:

1 cup Almond flour
½-cup whole-wheat flour
1/3-cup unsalted butter
¼ tsp baking powder
50 ml Maple syrup
Salt, a pinch
Cardamom powder to taste

Method:

1. Preheat oven to 355 degree F. Line a baking sheet with parchment paper.
2. In a bowl, mix together butter and maple syrup. Next, add whole wheat and almond flours and mix gently.
3. Mix in the baking soda, cardamom powder and salt.
4. Form the dough into tablespoon rounds and place on the lined baking sheet about 3 inches apart. (Garnish cookies with almonds but this is optional)
5. Bake for 15-18 minutes, or until golden brown around edges. Cool and enjoy!

These cookies are best enjoyed the day they are baked.

NOTES:

1. You can use coconut oil in place of butter in this recipe.
2. You may cut down the use of whole wheat flour if you wish for grain free cookies.
3. Coconut sugar is another good alternative to cane sugar in this recipe.

Nutrition breakdown: (Souce: MyFitnessPal app)

Nutrition Facts	
Servings 12.0	
Amount Per Serving	
calories 92	
	% Daily Value *
Total Fat 6 g	**10 %**
Saturated Fat 3 g	**17 %**
Monounsaturated Fat 1 g	
Polyunsaturated Fat 0 g	
Trans Fat 0 g	
Cholesterol 14 mg	**5 %**
Sodium 8 mg	**0 %**
Potassium 31 mg	**1 %**
Total Carbohydrate 8 g	**3 %**
Dietary Fiber 1 g	**3 %**
Sugars 3 g	
Protein 1 g	**2 %**
Vitamin A	**3 %**
Vitamin C	**0 %**
Calcium	**1 %**
Iron	**2 %**

Artwork by Isha Rane

Isha is 7-year-old & she loves drawing & coloring. Isha uses her imagination to draw and color the pictures. We all love her passion.

Painting by Saket Rane

Saket is 4 years old. His elder sister (Isha) loves to draw and color the pictures and Saket loves following her. So, one day he just asked us to wait and then went to the study room, locked the door and drew this cute family picture. when asked to explain he said it's Dad, Aaba, Mom, Didi and that small one is me (Saket). We were so amazed with his imagination.

Artwork by Nidhi Choudhari

Nidhi is 11 years old, 6th grader. Since her early ages she started painting and creating arts. She loves arts and crafts very much and regularly makes different kinds of creative arts. She uses oil pastels, charcoal, pencil color, water color, Acrylic color. She has done paintings on canvases and different drawing paper as required for the color medium. Her Shivaji Raje painting was published in 2015 Marathi Mandal Atlanta magazine and won the second prize for the Atlanta desi Khabar magzine's Diwali art competition in 2013.

Drawings by Vikrant Yadav

Vikrant is 8 years old. He enjoys artistic creativity, like drawing, origami and building new stuff using old things. He loves playing soccer and plays the position of a striker and a wing for his team.

A letter to a Tooth Fairy

- By Ms. Nishka Namjoshi (Age 6)

Nishka wrote this letter spontaneously as soon as she learnt she is travelling to India this summer :-).


Dear tooth fairy
I have a lose tooth I am not going to be here when my tooth fatls out I will be at ramanand india mumbai So when my tooth falls out you will Have to came to mumbai
Ps. I might be Home too.
Loveg
Nishka
Namjosh

Drawing by Nishka Namjoshi

Painting by Tanishka Shivekar

Tanishka loves painting. Whenever she gets free time either she will start drawing on paper or start painting on paint brush. She also likes singing and playing piano.



YOU ARE BEAUTIFUL!!!...

- Abhidnya Patharkar

For all the girls who are or trying to be self dependent!!...

You are beautiful not because you don't commit mistakes,
but you have a courage to accept them too..

You are beautiful not because you are independent,
but you have realized it's just a self dependence..

You are beautiful not because you are idealistic,
but you know how to be equally pragmatic..

You are beautiful not because you are enthusiastic,
but you are tired too..

You are beautiful not because you are ambitious,
but you don't lose your sensibility and sensitivity too...

You are beautiful not because you know you have a potential,
but you know how to explore it too..

You are beautiful not because you struggle for your rights,
but you care for the people you fight with too..

Most importantly, my dear, you are beautiful not just because you are an amazing woman but an awesome human being too...

कणा - कुसुमाग्रज

ओळखलंत का सर मला, पावसात आला कोणी,
कपडे होते कर्दमलेले केसांवरती पाणी
क्षणभर बसला, नंतर हसला, बोलला वरती पाहून,
गंगामाई पाहुनी आली गेली घरट्यात राहून.....

माहरे वाशीण पोरीसारखी चार भिंतीत नाचली,
मोकळया हाती जाईल कशी बायको मात्र वाचली,
भिंत खचली, चूल विझली होते नाहोते गेले,
प्रसाद म्हणून पापण्यांमध्ये पाणी थोडे ठेवले.....

कारभारणीला घऊेन संगे सर आता लढतो आहे,
चीखालगढ काढतो आहे, पडकी भिंत बांधतो आहे.....

खिशाकडे हात जाताच हसत हसत उठला
पैसे नकोत सर जरा एकटेपणा वाटला,
मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा,
पाठीवरती हात ठेवून फक लढ म्हणा..... !!!